महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाॅट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२९ वे | दिनांक : ०४/०५/२०२६ | वार सोमवार

## सावरकरांनी ५ वेळा इंग्रजांना दया याचिका पाठवल्या : सात्यकी सावरकरांची न्यायालयात साक्ष



**पुणे :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधातील मानहानीच्या खटल्यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पणतू सात्यकी सावरकर यांची पुण्याच्या विशेष न्यायालयात महत्त्वपूर्ण उलटतपासणी पार पडली. या सुनावणीदरम्यान सात्यकी सावरकर यांनी सावरकरांच्या दया याचिका, गोवंश विचार आणि सैन्य भरती यांसारख्या विविध ऐतिहासिक व सामाजिक विषयांवर न्यायालयात आपली भूमिका स्पष्टपणे मांडली.

न्यायालयात राहुल गांधींचे वकील मिलिंद पवार यांच्या प्रश्नांना उत्तर देताना सात्यकी सावरकर म्हणाले की, अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये असताना सावरकरांनी पाच वेळा ब्रिटीश सरकारला दया याचिका पाठवल्या होत्या, हे सत्य आहे. मात्र, त्या काळी सावरकरांप्रमाणेच इतर अनेक राजकीय कैद्यांनीही अशा कायदेशीर याचिकांचा आधार घेतला होता.

द्विराष्ट्रवादाच्या मुद्द्यावर बोलताना तसेच सावरकरांचा बचाव करताना सात्यकी सावरकर म्हणाले, ही संकल्पना सावरकरांनी मांडलेली नाही. काही इतिहासकार तसा आरोप करत असले तरी, मूळ संकल्पना सर सय्यद अहमद खान यांची होती. सावरकरांनी केवळ तत्कालीन परिस्थितीतील वस्तुस्थितीवर भाष्य करणे होते.

सावरकरांच्या विज्ञानवादी विचारांचा संदर्भ देताना सात्यकी म्हणाले, सावरकरांनी कधीही गाईला देव मानले नाही. त्यांच्या मते गाय हा एक उपयुक्त पशू होता. हा संदर्भ सावरकरांच्याच साहित्यातून येतो. तसेच कोणतीही मागणी केली नसल्याचा देखील खुलासा त्यांनी यावेळी न्यायालयात बोलताना केला.

दुसऱ्या महायुद्धात सावरकरांनी भारतीय नागरिकांना ब्रिटिश सैन्यात भरती होण्याचे आवाहन केले होते, याविषयी बोलताना सात्यकी म्हणाले, सावरकरांवर हा आरोप नसून आक्षेप आहे. तरुणांनी सैन्यात भरती व्हावे ही सावरकरांची रणनीती होती. भारतीयांना लष्करी प्रशिक्षण आणि शस्त्रास्त्रांचा अनुभव मिळावा, जेणेकरून स्वतंत्र भारताकडे स्वतःचे सक्षम सैन्य असेल, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. त्यांच्या याच भूमिकेमुळे १९४७ मध्ये पाकिस्तानच्या आक्रमणावेळी भारताकडे प्रशिक्षित सैन्य सज्ज होते.

भगतसिंग व इतर क्रांतिकारकांशी सावरकरांच्या तुलनेवर भाष्य करणे सात्यकी सावरकर यांनी टाळले असून, महापुरुषांचे उदात्तीकरण किंवा संसदेतील तैलचित्रांबाबतचा निर्णय हा केंद्र सरकारचा अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले. सावरकरांना 'भारतरत्न' देण्याच्या विषयावर बोलताना त्यांनी एकाच कुटुंबातील तीन सदस्यांना (नेहरू-गांधी) हा सन्मान मिळाल्याचा संदर्भ दिला. मात्र सावरकरांच्या बाबतीत असा निर्णय घेणे हे पूर्णपणे सरकारच्या अखत्यारीत असून आपण स्वतःहून तशी कोणतीही मागणी केली नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## पुण्यात २८ लाखांची लाच स्वीकारताना महिला पोलिस अधिकारी जाळ्यात




**पुणे :** शहर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत महिला सहायक पोलिस निरीक्षक (एपीआय) वैशाली मुरलीधर तोटेवार (49) आणि तिच्या खासगी हस्तकाला तब्बल 28 लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले. शनिवारी (2 मे 2026) दुपारी मंगलदास रोडवरील पंचतारांकित हॉटेल कॉनराडच्या प्रवेशद्वारासमोर ही धडक कारवाई करण्यात आली. आर्थिक गुन्हे शाखेसारख्या महत्त्वाच्या विभागातील अधिकारीच एवढ्या मोठ्या लाचप्रकरणी जाळ्यात अडकल्याने पोलिस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे.

यातील तक्रारदाराने आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर येथे एक तक्रार अर्ज दिला होता. या अर्जाची चौकशी एपीआय तोटेवार करत होत्या. तक्रारदाराने दिलेल्या अर्जाची चौकशी त्याच्या बाजूने करून, गैरअर्जदाराविरुद्ध कारवाई करून तक्रारदाराची जमीन त्याला परत मिळवून देण्याचे आमिष तोटेवार यांनी दाखवले होते. या कामासाठी त्यांनी यापूर्वीच 2 लाख रुपये स्वीकारले होते. तरीही समाधान न झाल्याने त्यांनी आणखी 30 लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. तडजोडीअंती 28 लाख रु. देण्याचे निश्चित झाले. याबाबत तक्रारदाराने 30 एप्रिल 2026 रोजी एसीबीकडे तक्रार नोंदवली होती. त्याच दिवशी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी झाली होती.

2 मे 2026 रोजी लाच स्वीकारण्याची वेळ ठरली. एपीआय वैशाली तोटेवार यांनी लाचेची रक्कम संभाजी चव्हाण याच्याकडे देण्यास सांगितले होते. त्यानुसार, दुपारी 1.09 वाजता एसीबीच्या पथकाने मंगलदास रोडवरील हॉटेल कॉनराडच्या एंट्री गेटसमोर सापळा लावला. चव्हाण याने तक्रारदाराकडून पंचासमक्ष 28 लाख रुपये स्वीकारताच त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर तत्काळ एपीआय वैशाली तोटेवार यांनाही ताब्यात घेण्यात आले.

## जे व्हायचंय ते होऊ द्या!, मनोज जरांगेंचा इशारा : बीडमध्ये राड्यानंतर जरांगेंची थेट भूमिका



**बीड :** जिल्ह्यातील नेकनूर येथे घडलेल्या तणावपूर्ण घटनेनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. दोन गटांमध्ये झालेल्या दगडफेकीच्या पार्श्वभूमीवर जरांगेंनी ठाम भूमिका घेत, जे व्हायचंय ते होऊन जाऊ द्या, असा सूचक इशारा दिला. त्यांच्या या विधानामुळे चर्चांना उधाण आले असून, परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नेकनूर येथे हरिनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमादरम्यान किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला. एका वाहनाचा धक्का लागल्याच्या मुद्द्यावरून सुरू झालेला वाद काही वेळातच वाढला. रिक्षा चालक आणि दुचाकीस्वार यांच्यातील बाचाबाचीने उग्र रूप धारण केले. या वादात महिलांसह लहान मुलालाही मारहाण झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले असून, त्यातून घटनेची तीव्रता स्पष्ट होते.

घटना वाढत गेल्यानंतर दोन्ही गट आमनेसामने आले आणि एकमेकांवर दगडफेक सुरू झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला. मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. शांतता भंग केल्याप्रकरणी पोलिसांनी ३० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, ११ जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईनंतर परिसरात तणाव कायम असला तरी सध्या परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर नेकनूर येथे आलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. आमच्यावर कितीही केसेस दाखल झाल्या तरी आम्हाला त्याची भीती नाही. आम्हाला नोकऱ्या लागणार नाहीत. जे व्हायचंय ते होऊ द्या, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साह निर्माण झाला, तर विरोधकांनी यावर टीका केली आहे.

तथापि, त्यांनी केवळ इशाराच दिला नाही तर समाजाला शांततेचे आवाहनही केले. सर्व समाजातील लोक एकत्र गुण्यागोविंदाने राहतात. फक्त दोन-चार लोक चुकीचे वागतात म्हणून संपूर्ण समाजाला दोष देणे चुकीचे आहे, असे ते म्हणाले. त्यांनी दोन्ही गटांना संयम बाळगण्याचे आणि परिस्थिती अधिक बिघडू न देण्याचे आवाहन केले. या संपूर्ण प्रकरणानंतर दोन्ही समाजातील नागरिकांनीही शांततेचा मार्ग स्वीकारण्याचे संकेत दिले आहेत.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील हे बंकटस्वामी संस्थानच्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमासाठी नेकनूरमध्ये आले होते. त्यावेळी त्यांनी समाजात सलोखा राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आता या प्रकरणानंतर पुढील काही दिवसांत परिस्थिती कशी विकसित होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०४ मे २०२६


# प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न



मुरूम, ता. उमरगा  श्री माधवराव पाटील महाविद्यालयात सेवापूर्ती सोहळ्याप्रसंगी बसवराज पाटील व बापूराव पाटील यांच्या हस्ते डॉ. सुधीर पंचगल्ले व सौ. विजया यांचा सत्कार करताना मान्यवर.

**मुरूम** : नगर शिक्षण विकास मंडळ संचलित श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. सुधीर पंचगल्ले यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा शुक्रवार (ता. १) रोजी अत्यंत भावपूर्ण आणि उत्साही वातावरणात पार पडला. प्रदीर्घ शैक्षणिक योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी राज्यमंत्री तथा भाजपा लातूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील म्हणाले की, प्राध्यापक हा केवळ तासिका घेणारा कर्मचारी नसून तो पिढ्या घडवणारा खरा शिल्पकार असतो. डॉ. पंचगल्ले यांनी आपल्या सेवाकाळात पुस्तकी ज्ञानासोबतच हजारो विद्यार्थ्यांना जगण्याची दिशा दिली. निवृत्ती ही केवळ सेवापुस्तकातील असते, कर्तव्यातील नसते. कर्तव्यातून निवृत्ती कधीच नसते. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग समाजाला यापुढेही होत राहील याची खात्री आहे. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, सहाय्यक शिक्षण संचालक संजय पंचगल्ले, सत्यसाई पब्लिक स्कूलचे (भालकी) अध्यक्ष चंद्रशेखर यम्मे, प्रादेशिक व्यवस्थापक शिवाजी शिंदे (पानिपत), धनराज मंगरुळे, डॉ. सतीश शेळके, सूर्यकांत जाधव, गणेश अंबर, उल्हास घुरघुरे यांची उपस्थिती होती. बसवराज पाटील व बापूराव पाटील यांच्या हस्ते डॉ. सुधीर पंचगल्ले व त्यांच्या सुविद्य पत्नी विजयाताई यांचा शाल, सन्मानचिन्ह, बुके आणि मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला. आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ. पंचगल्ले भावूक झाले होते. या महाविद्यालयाने मला ओळख दिली आणि इथल्या विद्यार्थ्यांनी मला सदैव कार्य करण्याची ऊर्जा दिली, अशा शब्दांत त्यांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली.याप्रसंगी संजय पंचगल्ले, प्रा. विजया बेलकेरी, डॉ. राम बजगिरे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक हाळे, संजय गोणगे, अशोक बेलकेरी, मनोज पंचगल्ले, अरुण राजेश्वरे, अनिकेत पंचगल्ले, शिवराज पंचगल्ले यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले यांनी तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. या सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# भक्तनिवास उभारणी वेगात, निधी संकलनासाठी समिती गठीत



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने तिरुपती येथे महाराष्ट्रातील समाज बांधवांसाठी भक्तनिवास उभारणी चे काम वेगाने सुरु आहे. तिरुपती येथील एक एकर क्षेत्रावर हे भव्य दिव्य भक्त निवास चे बांधकाम सुरू आहे. आ सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते भुमिपुजन झाल्यानंतर अगदी विक्रमी वेळेत पहिला स्लॅब पुर्ण झाला आहे. एकुण पाच मजली इमारत होणार असुन सर्व सुविधा युक्त १०२ रुम भक्तांना उपलब्ध करुन देण्यात येतील. सोबतच प्रशस्त किचन, डायनिंग , रिसेप्शन, भव्य पार्किंग, मिटींग हाॅल, वासवी मंदिर  श्री रंगनाथ महाराज मंदिर व इतर अनेक सुविधांचा नियोजित आराखडा तयार करण्यात आला आहे. सर्व बांधकाम देणगी दारांच्या माध्यमातून पुर्ण होणार आहे. यासाठी निधी संकलन आवश्यक असल्याने निधी संकलन समिती गठीत करण्यात आली असुन बांधकाम समितीचे कोषाध्यक्ष अनिल मनाठकर यांच्या नेतृत्वाखाली, महासभेचे जिल्हाध्यक्ष, महासभेचे पदाधिकारी, बांधकाम समितीचे सदस्य व स्थानिक समाज मंडळाचे अध्यक्ष व समिती सदस्य यांच्या मार्फत महाराष्ट्रातील सर्व जिल्हात निधी संकलन करुन बांधकाम पुर्ण करण्याचा ठराव या पूर्वीच झाला असुन आता गती वाढविण्याच्या दृष्टीने दिनांक २ मे रोजी महासभा कार्यालयात संपन्न झालेल्या बैठकीत एकमताने आढावा घेण्यात आला. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बांधकाम समितीचे अध्यक्ष श्री सुर्यकांत शिरपेवार होते. यावेळी इमारत बांधकामाच्या सद्य परिस्थितीची माहिती देऊन सर्व बांधकाम हे तांत्रिक आराखड्या प्रमाणे होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीला प्रमुख पाहुणे म्हणून महासभेचे अध्यक्ष श्री नंदकुमारजी गादेवार, महासचिव श्री गोविंदराव बिडवई, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, सदानंद मेडेवार यांच्या सह बांधकाम समितीचे सदस्य उपस्थित होते. भक्त निवास च्या बांधकामा कडे राज्यातील समाज बांधवांचे लक्ष लागले असून बांधकाम पूर्ण करून वर्षभरात भक्तांना सुविधा पुरवण्याचा संकल्प  अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी केला आहे.  बैठकीच्या शेवटी  सुमीत रुद्रवार यांनी  आभार प्रदर्शन केले. गोविंदा गोविंदा च्या जयघोषात बैठकीचा समारोप करण्यात आला.अशी माहिती राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार यांनी दिली

# सुखना नदीच्या संवर्धनासाठी सर्वांनीच पुढे यावे - डॉ. सर्जेराव जिगे



**छत्रपती संभाजीनगर** : सुखना नदीची अत्यंत भयावह अवस्था झाली असून सांडपाणी व प्रदुषित रसायनमुक्त पाण्यामुळे ही नदी प्रचंड प्रदुषित झाली आहे. कधीकाळी निर्मळ वाहणारी सुखना नदी आज गटारगंगा झाली आहे. सुखना नदीच्या संवर्धनाची जबाबदारी आपणा सर्वांची असून या नदी संवर्धनासाठी सर्वांनीच पुढे यावे असे प्रतिपादन मराठी भाषा परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांनी केले. ( ता. 2) चिकलठाणा येथील सुखना नदी परिसरातील हॉटेल काळे बंधू येथे सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीची विशेष बैठक व कविवर्य नारायण सूर्वे अभिवादन कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी उदघाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अशोकराव काळे होते. त्यांनी पाहुण्यांचे शॉल व पुस्तक भेट देवून स्वागत केले.व्यासपीठावर नगरसेवक शिवाजीराव दांडगे, कविसंमेलनाध्यक्ष डॉ. सुभाष बागल, समितीचे संस्थापक डॉ. शिवाजी हुसे , सहसचिव सुरेश जुए पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी नगरसेवक पदी निवडून आल्याबद्दल शिवाजीराव दांडगे यांचा सत्कार करण्यात आला.डॉ. शिवाजी हुसे संपादित धोंडी धोंडी पाणी दे या कवितासंग्रहाचे प्रकाशनही करण्यात आले. या प्रसंगी सुखना नदी संवर्धन व पुनरुज्जीवनासाठी पुढील जन आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली. अशोकराव काळे यांनी आतापर्यंत समितीच्या कामाचा व पाठपुराव्याचा आढावा घेवून यापुढेही हा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार केला. सुरेश जुए पाटील, शिवाजीराव दांडगे यांनीही सुखना नदीच्या संवर्धनासाठी सर्वच पातळीवर पुढाकार घेवून पाठपुरावा करू असे मत व्यक्त करून सुखनाकाठी वृक्षारोपण करण्याचा मनोदय व्यक्त केला. डॉ. शिवाजी हुसे यांनी ठराव वाचन करून पुढील आंदोलनाची रूपरेषा जाहीर केली.यावेळी दिपक नागरे यांनी शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या जीवनावर भाष्य करणारी, आर. पी. शिखरे यांनी निसर्ग भेदभाव करीत नाही, तर माधुरी चौधरी यांनी नदीविषयीची कविता सादर केली. अशोक शेवगण यांनी कामगाराच्या जीवन संघर्षावर प्रकाश टाकला. हबीब भंडारे यांनी सलोख्याची भाषा माणसं विसरताहेत याकडे लक्ष वेधले. सुशिल सातपुते यांनी आजच्या वास्तवावर प्रहार केले. डॉ.सर्जेराव जिगे, डॉ.शिवाजी हुसे यांनी नदी वर कविता सादर केली. याप्रसंगी समितीच्या वतीने २५ ठराव संमत करून त्यावर चर्चा केली. पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करून हा लढा सुरूच ठेवण्याचा एकमुखी निर्धार केला. सुखना नदी संवर्धन विकास आराखडा तयार करून अंमलबजावणी करा. मिशन गाळमुक्त सूखना, सुखनाची आरोग्य पत्रिका जाहीर करा. स्वतंत्र डीपीआर तयार करावा. पुराने जमिनी वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी. बंधाऱ्याची व पुलाची डागडुजी करावी. अवैध्य वाळू उपसा थांबवावा. सुखना महोत्सव व पक्षी महोत्सव सुरू करावा. नदीकाठच्या ऐतिहासिक, धार्मिक वारसा स्थळांचा विकास करावा. सुखना नदी प्राधिकरण स्थापन करावे. २०३१ पर्यंत निर्मल सुखना घोषीत करावे. ऊगम व संगम पर्यटन स्थळ घोषित करावे. नदीकाठच्या गावात विविध विकास योजना राबवाव्यात, दुषित व सांडपाणी थांबवावे. आदी २५ ठराव मांडून ते व सविस्तर अहवाल शासन व प्रशासनास देण्याचे ठरले. तसेच समितीच्या वतीने विविध उपक्रम सुरू करून समाजाला नदीशी जोडण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप डॉ. सुभाष बागल यांनी केला.

त्यांनी सुखना - दुधना नदीची सदय:स्थिती यावर भाष्य करून या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन करून नारायण सूर्वे यांच्या कवितेवर भाष्य केले. सुरेश जुए पाटील यांनी आभार मानले. यावेळी महादेव बोंडारे, रमेश बोंडारे, लहू तुपे, यांचीही उपस्थिती होती.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०४ मे २०२६


## कल्पना भातांब्रेकर यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इतिहास विषयात श्रीमती कल्पना प्रभुदास भातांब्रेकर यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली. यांनी "म. बसवेश्वर यांच्या समतामूलक आणि परिवर्तनवादी कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास" या विषयावर आपला शोध प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्या शोध कार्यासाठी प्रोफेसर डॉ. किशोरकुमार गोवर्धन गव्हाणे यांचे मार्गदर्शन लाभले होते. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे आई-वडिल, मार्गदर्शक प्रोफेसर डॉ. किशोरकुमार गोवर्धन गव्हाणे, प्रो. गीतांजली बोराडे मॅडम, डॉ. शारदा बंडे व मित्र परिवार आदींनी अभिनंदन केले आहे.

## कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालय, बारावीच्या परीक्षेत ठरले अव्वल

**(शिरूर कासार) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे.आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाने याही वर्षी बोर्डाच्या निकालात विभागातून अव्वल स्थान पटकाविले आहे.विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे तिन्ही शाखेत एकूण ४५३ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते.त्यापैकी २३८ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले,तर १६०विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीतील गुण संपादन करून निकालाचे स्थान अव्वल ठेवले आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण सरासरी निकाल ९८.६७ % टक्के लागला आहे. विद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत.(विज्ञान शाखेतून) कु. श्रावणी नितीन कदम (९४.१७%) टक्के मिळवून प्रथम आली. कु.प्रीती अभिमान उगले (९३.३३%)टक्के व कु.स्नेहल अण्णासाहेब ढाकणे (९३.३३%) या दोघींनी समान गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला तर,चिं.अथर्व केशव भांगे(९३.००%) टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळविला.(कला शाखेतून) चिं.विशाल अरुण भिल्लारे (८२.००%) टक्के घेऊन प्रथम क्रमांक मिळविला.कु प्रतीक्षा लहू पुरी (८१.६७%) टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर कु.शितल संतोष साळवे (८१.००%)टक्के व कु. आरती हनुमंत निटूकडे (८१.००%) टक्के या दोघींनी समान गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.तसेच कु.संकेशा लाला गायकवाड (७९.६७%) टक्के गुण घेऊन उत्तेजनार्थ नंबर मिळविला. तसेच (वाणिज्य शाखेतून) कु.श्रीजा संतोषकुमार ढाकणे (८६.००%)टक्के घेऊन प्रथम क्रमांक पटकावला व कु.समृद्धी शरद शिंदे (७४.३३%) टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर कु.आयेशा नाशर शेख यांनी(७३.३३%) टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळविला.कॉपी मुक्तीच्या वातावरणातही आपले अव्वल स्थान ठेवल्यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब मा. रोहित (भैय्या) क्षीरसागर साहेब, प्रशासन अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब, सहा.प्रशासन अधिकारी मा. योगेशजी पवार साहेब, कार्यवाहक एम.ए. राऊत,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे, परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, परीक्षा सहाय्यक प्रा.विनोद गलांडे, विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे, वाणिज्य प्रमुख डॉ. सत्यनारायण ढवळे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. आत्माराम झिंजुर्डे तसेच ज्यांनी वर्षभर अतिशय मेहनतीने अध्यापनाचे कार्य केले,ते सर्व विषयाचे कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## अहिराणी लोकसाहित्याला राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाला




**कन्नड (अरुण थोरात) :** केंद्रीय हिंदी संस्थान आग्रा व हिंदी विभाग शिवाजी महाविद्यालय कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.02 व 03 मे 2026 रोजी पूर्वोत्तर लोकसाहित्य प्रकल्प अंतर्गत आहिराणी लोकसाहित्य संकलन, निवड व हिंदी अनुदान यांचे कार्यलय धुळे येथील प्रा. योगेश पाटील हिंदी विभाग प्रमुख विद्यावर्धिनी महाविद्यालयास प्रकल्प मिळाला त्याअंतर्गत दुसरी कार्यशाळा कन्नड येथील शिवाजी महाविद्यालय येथे संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रिय हिंदी संस्थान आग्रा चे निदेशक प्रा. सुनिल बाबुराव कुळकर्णी यांचे शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. उर्मिला पाटील जळगाव या होत्या, प्रमुख पाहुणे डॉ. रामचंद्र काळुंखे, आहिराणी संपादक डॉ. रमेश सूर्यवंशी, हिंदी संपादक प्रा. योगेश पाटील, स्थानिक समन्वयक डॉ. गोविंद बुरसे व्यासपीठावर उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात प्रा. सुनिल कुळकर्णी यांनी बोलीभाषांचा अभ्यास मुख्य प्रवाहात येण्यासाठी भाषा अभ्यासकांनी प्रयत्न केले पाहिजे, त्यातही अहिराणी बोलीतील लोकसाहित्य हे प्रगल्भ असून त्याला राष्ट्रीय स्तरावर, या माध्यमातून न्याय देऊ या. अहिराणीचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी भाषा अभ्यासकांनी एकत्र येवून हे कार्य पूर्णत्वास न्यावे, अहिराणी ही केवळ एक बोली नसून ही खानदेशच्या मातीतून उगवलेली लोकजीवनाची, परंपरेची आणि संस्कृतीची जीवंत अभिव्यक्ती आहे.याप्रसंगी प्रमुख पाहूणे डॉ .रामचंद्र काळुंखे यांनी भाषेच्या संवर्धनासाठी त्रिभाषा सुत्रामध्ये मातृभाषेचा समावेश झाला पाहिजे असे नमूद केले अध्यक्षीय भाषणात डॉ.उर्मिला पाटील यांनी अहिराणी खानदेशातील लोकजीवनाचा आत्मा आहे त्यातील साहित्य हे सांस्कृतिक वारशा चा अमूल्य ठेवा आहे. असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ .योगेश पाटील, सूत्रसंचलन डॉ. अलका गडकरी व आभार डॉ. सुनिल पाटील यांनी केले.कार्यशाळा चार सत्रात घेण्यात आली. सदर कार्यशाळेसाठी भाषा अभ्यासक म्हणून डॉ. अनिल सूर्यवंशी (चोपडा), डॉ सविता चौधरी (पोराळा) डॉ. स्वाती शेलार (एरंडोल) प्रा. सुनिल पाटील (धुळे), डॉ वाल्मीक अहिरे (पाचोरा) यांनी अहिराणी लोकसाहित्य संकलन, निवड व हिंदी अनुवाद यावर कार्य केले. पहिले सत्र डॉ. रमेश सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या सत्रात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. वाल्मीक अहिरे यांनी खानदेशी आहणा (कोडी) याविषयावर मार्गदर्शन केले, या सत्रात मागील तीन महिन्यात झालेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला. तसेच हिंदी अनुवादावर येणाऱ्या अडचणीवर चर्चा करण्यात आली, द्वितीय सत्र डॉ. योगेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. त्यात हिंदी अनुवादातील व्याकरण दृष्ट्या चर्चा करण्यात आली.दि. 3 मे रोजी तृतीय सत्राचे अध्यक्ष डॉ. उर्मिला पाटील होत्या. यात आहिराणी लोक साहित्याचे विविध अंग लोककथा, लोकगीत इत्यादीचा. प्रकल्पात समावेश करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.कार्यशाळेचा समारोप शिवाजी महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. गोविंद बुरसे यांच्या अध्यक्षते खाली पार पडला. याप्रसंगी डॉ बुरसे म्हणाले की, केंद्रिय हिंदी संस्थान आग्राच्या पूर्वोत्तर लोकसाहित्य प्रकल्पांतर्गत अहिराणी सारख्या असंख्य बोलीच्या साहित्याचे संकलन व हिंदी अनुवाद कार्यामुळे बोलीभाषांच्या संवर्धनात मदत होईल व राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण होईल. कार्यक्रमाचे संचलन डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी केले. कार्यशाळेचे संयोजक डॉ. योगेश पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवाजी महाविद्यालयाचे सहकार्य लाभले


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०४ मे २०२६


## वयात येणारी मुलं आणि पालक

आजच्या काळात मुलं वयात येताना (किशोरवयात प्रवेश करताना) त्यांच्या मनात अनेक बदल होतात. हे बदल शारीरिक, भावनिक आणि मानसिक असतात. पालक म्हणून या बदलांची जाणीव ठेवणे आणि मुलांची मानसिकता समजून घेणे हे खूप महत्त्वाचे आहे. कारण याच वयात मुलं स्वतःची ओळख शोधतात, स्वातंत्र्याची ओढ व्यक्त करतात आणि जगाशी जोडले जातात. जर पालकांनी याकडे दुर्लक्ष केले तर मुलं एकटेपणा, गोंधळ किंवा बंडखोरीच्या भावनेत जाऊ शकतात. उलट, समजूतदार पालकत्वामुळे मुलं आत्मविश्वासाने, सुरक्षिततेने आणि जबाबदारीने वाढतात. किशोरवय (साधारणतः १२ ते १८ वर्षे) हे 'स्टॉर्म अँड स्ट्रेस'चे वय मानले जाते. यामध्ये हार्मोन्समुळे उंची वाढणे, आवाज बदलणे, शरीराची रचना बदलणे इत्यादी बदल होतो. एका क्षणी आनंद, दुसऱ्या क्षणी राग किंवा उदासीनता. हे सामान्य आहे. स्वतःविषयी प्रश्न मी कोण आहे? मला काय हवे आहे?, मित्रांचा प्रभाव वाढणे, पालकांपासून दूर जाण्याची इच्छा, भविष्याची चिंता.पालकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की हे बदल बिघडलेपणा नव्हे, तर नैसर्गिक विकासाची प्रक्रिया आहे.मुलांची मानसिकता समजून घेण्याचे मार्गमुलं बोलू लागली की 'तू काय बोलतोस?' किंवा 'आमच्या काळी असं नव्हतं' असे म्हणून बोलणे थांबवू नका. त्यांना 'मी तुझ्याबरोबर आहे' असे वाटेल असे वातावरण तयार करा. रोज १०-१५ मिनिटे फक्त ऐकण्यासाठी वेळ काढा. प्रश्न विचारताना 'काय झालं?' ऐवजी 'तुला कसं वाटतं?' असा वापर करा."मी तुझ्या जागी असतो तर मलाही तसंच वाटलं असतं," असे म्हणणे मुलांना खूप आधार देते. त्यांच्या भावनांना 'वेडे' किंवा 'अतिरेकी' म्हणू नका. उदाहरणार्थ, मित्रांशी भांडण झाल्यावर "सगळे मित्रच सोडून गेले" असे म्हणण्याऐवजी "हे खूप वाईट वाटलं असेल, बरोबर?" असे म्हणणे चांगले.मुलं स्वतंत्र निर्णय घेऊ लागतात. त्यांना छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये निर्णय घेण्याची संधी द्या उदा. कपडे निवडणे, अभ्यासाचे वेळापत्रक. पण मोठ्या गोष्टींमध्ये जसे सुरक्षा, अभ्यास आणि नैतिक मूल्ये याबाबतीत स्पष्ट नियम ठेवा. "मी तुझ्यावर विश्वास ठेवतो, पण हे सुरक्षित नाही" असे स्पष्ट सांगा.त्यांच्या मोबाइल, डायरी किंवा मित्रांशी संवादात अनावश्यक हस्तक्षेप करू नका. आपले संशयी वर्तन मुलांमध्ये अविश्वास निर्माण करू शकते. जर काही चिंता वाटली तर "मला काळजी वाटते, बोलू शकतो का?" असे खुलेपणाने सांगा.पालकांनी स्वतः पुस्तके, डॉक्टर किंवा विश्वासार्ह वेबसाइट्सवरून किशोरवयातील मानसिक बदलांबद्दल माहिती घ्यावी. मुलांना सांगावे की "हे हार्मोन्समुळे होतं, तू एकटा नाहीस." यामुळे मुलांना आपल्या भावनांची कारणे समजतात आणि ते स्वतःला दोष देत नाहीत. मुलांची प्रशंसा करा त्यांच्या सकारात्मक आणि चांगल्या गोष्टींवर लक्ष द्या. इतरांशी त्यांची तुलना करू नका"तुझा मित्र कसा हुशार आहे आणि तू बघ" असं बोलू नका. शक्य असेल तेव्हा एकत्र जेवण, फिरणे, खेळणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंध अधिक मजबूत होतात. मुलांमध्ये सतत उदासीनता, झोप न लागणे, भूक न लागणे. शाळेत जाण्यास टाळणे, अभ्यासात मोठी घसरण, अति राग, हिंसक वागणूक किंवा स्वतःला इजा करण्याची धमकी, ड्रग्ज, धूम्रपान किंवा इतर व्यसनांची चिन्हे दिसून आल्यास मानसोपचार तज्ज्ञांची मदत घ्या.पालक म्हणून आपली भूमिका 'नियंत्रक' नसून 'मार्गदर्शक' असावी. वयात येणारे मूल हा आपला छोटा मित्र आहे, जो स्वतंत्र व्यक्ती होण्याच्या प्रवासात आहे. त्याची मानसिकता समजून घेतल्यास तो विश्वासाने, प्रेमाने आणि जबाबदारीने मोठा होईल. ही प्रक्रिया निश्चितच सोपी नाही, पण प्रेम, धीर आणि ज्ञानाने नक्की शक्य आहे. मुलं ज्या पालकांकडे पाहून जग शिकतात, तेच पालक त्यांच्यासाठी सर्वात मोठा आधार असू शकतात.पालकांनो, आपल्या मुलाशी आजच बोलण्यास सुरुवात करा. एक छोटासा संवादही त्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकतो!

**डॉ. संतोष डाखरे**
8275291596

## "बुद्ध"

शांत डोळ्यांत करुणेचा सागर,
ओठांवर सत्याची वाणी,
राजसुख सोडून चालत निघाला,
दुःखाच्या शोधाची कहाणी।
बोधीवृक्षाखाली ध्यानस्थ झाला,
मनात प्रकाश उजळला,
चार आर्य सत्यांचा दीप घेऊन
जगाला मार्ग दाखवला।
अहिंसा, करुणा, मध्यम मार्ग,
हीच त्यांची शिकवण ठरली,
राग-द्वेष सोडून दे म्हणत
मानवतेची वाट उजळली।
ना वैभव, ना सत्ता हवी,
मन शुद्ध असेल तर पुरे,
बुद्ध म्हणाले — स्वतःला जाण,
तेव्हाच जीवन खरे ।

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## 'आमच्या संस्कृतीची माय असते नदी' कविवर्य नारायण सूर्वे अभिवादन कविसंमेलन रंगले






**छत्रपती संभाजीनगर** : सुखना बचाओ जनआंदोलन व संघर्ष समिती ही सुखना नदी पुनरुज्जीवन व संवर्धन करण्यासाठी कार्यरत असून या जनआंदोलनाचा एक भाग म्हणून सातत्याने नदी व समाज यांच्यात एक ऋणानुबंध तयार होऊन समाज नदिशी जोडला जावा, नदीविषयक जाणिव जागृती वाढावी या उद्देशाने विविध कार्यक्रमाचे आयोजन सुखना काठी आयोजित केले जातात. २ मे रोजी कामगार दिनाच्या निमित्त व कविवर्य नारायण सूर्वे यांच्या जमशताब्दी निमित्त अभिवादन कवि संमेलन डॉ. सुभाष बागल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. डॉ. सर्जेराव जिगे उदघाटक होते. मंचावर समितीचे अध्यक्ष अशोकराव काळे, नगरसेवक शिवाजीराव दांडगे, डॉ. शिवाजी हुसे, सुरेश जुए पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोकराव काळे यांनी केले. या प्रसंगी शेतकरी, कामगार, नदी व पर्यावरण आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे कवि संमेलन एकापेक्षा एक कवितांच्या सादरीकरणाने रंगले. दिपक नागरे यांनी नाही सोसवत हाल, वणवा डोक्यात पेटला, शेतकऱ्यांच्या जीवनी अंधार दाटला या कवितेतून शेतकरी कामगारांचे दुःख मांडले. आर. पी. शिखरे, यांनी सुंदर ही निसर्गाची रित ना भेद करतो ना प्रित ही निसर्ग कविता सादर केली माधुरी चौधरी यांनी नदी विषयक ' नित्य नेहमी ती जाऊन बसते, नदीच्या काठावर ' हे सुरेख कविता सादर करून नदी व स्त्री यांच्या नात्यावर प्रकाश टाकला . अशोक शेवगण यांनी ' माझी जे तुम्हाला माझी व्यथा सांगतील याच आठवणीसाठी देह जपून ठेवले, या कवितेतून मानवी जीवनाची व्यथा मांडली. हबीब भंडारे यांनी खोटे गुन्हे तक्रारी दाखल होऊ लागले की माणसं विसरतात सलोख्याची भाषा ही आजच्या सामाजिक वास्तववावर प्रहार करणारी कविता सादर करून अंतर्मुख केले. डॉ. सुशिल सातपुते यांच्या मी पाहत नाही चित्रपट थेटरवरचा पाहत असतो पत्रकार परिषदा आणि चॅनल वरच्या चर्चा ही विदारक भाष्य करणारी कविता सादर केली. डॉ. शिवाजी हुसे यांनी नदी अशी खळखळून वाहतांना दिसली की मन आनंदून जाते ' ही नदीच्या निर्मळ वाहण्याची कविता सादर केली. तर डॉ. सर्जेराव जिगे यांच्या ' आमच्या संस्कृतीची माय असते नदी ' ही नदी व मानवी संस्कृती आणि लोकजीवनावर भाष्य करणारी कविता सादर करून रंगत आणली. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. सुभाष बागल यांनी कविवर्य नारायण सूर्वे यांच्या जीवन व कवितेवर भाष्य केले. तसेच मी अंकुरत रहावे जीवनभर मातीच्या कणासाठी जाळणाऱ्या उन्हासाठी ' ही माती व नाती, माणूस यांच्यातील भावबंधावर प्रकाश टाकणारी कविता सादर करून समारोप केला. अशोकराव काळे यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमास रमेश बोडारे, लहु तुपे , महादेव बोंडारे यांच्यासह कामगार उपस्थित होते. एकापेक्षा एक सरस कविता सादर करून कविसंमेलनात रंगत आणली. सूत्रसंचलन कवी डॉ. सुशिल सातपुते यांनी केले तर आभार समितीचे सहसचिव सुरेश जुए यांनी आभार मानले.

## बापाचं अस्तित्व

बापाच्या हयातीत सारे,
सुखी समाधानी असतात.
बाप गेल्यावर जगतांना,
सारेच संकटात दिसतात. १

बाप माणूस कोणालाच,
जीवंतपणी कळत नसतो.
बाप गेल्यावर बापाचे,
आठवण करीत बसतो. २

बापाची कमतरता,
बाप गेल्यावर कळते.
बापाविना संकटात,
मन सैरावैरा पळते. ३

बापाचं अस्तित्व कळायला,
बापाला मरावे लागते.
लेक माहेरी आल्यावर,
बापाला दरात शोधते. ४

बाप सोडून गेल्यावर,
बापाची आठवण येते.
सदा सर्वांना संकटात,
बाप नावचं ऊर्जा देते. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०४ मे २०२६


## पब्लीक हायस्कूल व ज्युनियर कॉलेजचा पहिल्याच वर्षी ९७.६१ टक्के निकाल!




**मोहाडी, जळगाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता १२ वीच्या (HSC) निकालात मोहाडी येथील इकरा रेसिडेन्शियल पब्लिक हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजने आपल्या पहिल्याच प्रयत्नात नेत्रदीपक यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचचा निकाल ९७.६१ टक्के लागला असून, शैक्षणिक क्षेत्रात संस्थेचे मोठे कौतुक होत आहे.या परीक्षेत महाविद्यालयातील एकूण ४२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ४१ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत बागवान रेहान युसूफ याने ८२.१७% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला.आफिया युनूस देशमुख (८०.३३%) हिने द्वितीय, तर चौधरी शिफा अय्युब (७९.१७%) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.तसेच रुमैसा अझीम शेख (७४.६७%) आणि रोशनी दस्तगीर पिंजारी (७४.१७%) यांनी अनुक्रमे चतुर्थ व पाचवा क्रमांक मिळवून यश संपादन केले.

महाविद्यालयाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार, प्राचार्य शेख शकील आणि कॉलेज इनचार्ज मोहसीन खान यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे. शिक्षकांचे अथक परिश्रम यामुळेच पहिल्याच वर्षात हे यश गाठणे शक्य झाले, अशी भावना प्रशासनातर्फे व्यक्त करण्यात आली आहे.

## जोगवाड्यात रात्री भीषण आग; आदिवासी शेतकऱ्याचा संसार राख, लाखोंचे नुकसान





**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील जोगवाडा येथील गट क्रमांक 56 मध्ये राहणारे आदिवासी शेतकरी मारोती देवबा वाळके यांच्या शेतातील घराला काल दिनांक २ मे रोजी रात्री भीषण आग लागून संसारोपयोगी साहित्य, धान्यसाठा,रोख रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली. या दुर्दैवी घटनेमुळे वाळके कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा अचानक घरातून धूर व आगीच्या ज्वाळा बाहेर येताना दिसताच परिसरातील नागरिक आणि शेजारील शेतकरी मदतीसाठी धावून आले. ग्रामस्थांनी पाण्याच्या सहाय्याने आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले,मात्र आग वेगाने पसरल्याने घरातील सर्व साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.या आगीत गहू, ज्वारी, हरभरा, करडी, तूर, उडीद, सोयाबीन यांसह मोठ्या प्रमाणातील धान्य जळून नष्ट झाले. तसेच फर्निचर, कपडे, भांडी, घरगुती साहित्य, शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि इतर महत्त्वाची कागदपत्रेही पूर्णतः जळून खाक झाली. घरात ठेवलेली रोख रक्कमही आगीत नष्ट झाल्याने कुटुंबीयांसमोर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच शेजारील शेतकरी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मोठ्या प्रयत्नांनी आग आटोक्यात आणली. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असली, तरी आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्याने वाळके कुटुंबीयांचा आक्रोश पाहून ग्रामस्थही हळहळले.घटनेची माहिती मिळताच चारठाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दळवे यांनी घटनास्थळी भेट दिली. तलाठी वाकळे यांनी पंचनामा केला. यावेळी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, पीडित आदिवासी शेतकरी कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत, धान्य व निवाऱ्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## पाली विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून आदर्श शिंदे ची उज्वल कामगिरी

**गोषेगाव :** मानव विकास व पूर्णनिर्मान संशोधन संस्था, औरंगाबाद संचलित,सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,गोषेगाव ता.भोकरदन जि.जालना या शाळेचा विद्यार्थी आदर्श विठ्ठल शिंदे याने पाली विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.त्याच बरोबर शरयू रविंद्र जाधव 98 गुण, ऋतुजा अप्पराव खरात 97 गुण प्राप्त केले त्याच बरोबर 25 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी 90 ते 95 गुण प्राप्त केलेले आहे.त्याच्या या यशामुळे शाळेचे नाव जिल्ह्यात गौरवाने घेतले जात असून शिक्षक, पालक व ग्रामस्थांकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन कठोर परिश्रम यांच्या जोरावर हे यश मिळवले तसेच विषय शिक्षक प्रा.डी.बी.मगरे, प्रा.डी.एस. धुवे सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले असल्याचे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष मा.सुनीलजी वाकेकर साहेब व संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर मॅडम, यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पर्यवेक्षक श्री निलेश कंकाळ तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी शुभेच्छा दिल्या.या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत देवगिरी महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत देवगिरी महाविद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. देवगिरी महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९६ .०० टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९९.०० टक्के, कला शाखेचा निकाल ७६.७६ टक्के तर व्होकेशनल शाखेचा निकाल ९५.२३ टक्के लागला आहे.महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील १३२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेत प्रथम कु. वेदिका संजय गोपाळे ९३.३३ टक्के द्वितीय गिरिजा रंजीतसिंह चव्हाण ९०.१७ टक्के व तृतीय कु. ईशा सतीश जमालपुरे ८९.६७ टक्के.वाणिज्य शाखेतील ४९० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेत प्रथम कु. स्वरा अजय देशमुख ही विद्यार्थीनी ९७.६७%, द्वितीय कु. योग स्वप्नील श्रॉफ ९७.३३%, तृतीय प्रीती भारत मुळे ९७.०० टक्के असून वाणिज्य शाखेत ९० टक्के पेक्षा जास्त ११३ विद्यार्थी आहेत.कला शाखेतील ५४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. कला शाखेत प्रथम दत्तू अशोक जाधव ९२.१७%, द्वितीय कु. सुहाणी सुभाष शिंदे ९२.००% आणि तृतीय युक्ता सचिन देशपांडे ९१.८३% असून शाखेत ९० टक्के पेक्षा जास्त १० विद्यार्थी आहेत. महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील 20 विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहे, २० विद्यार्थ्यांनी पाली विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत असताना महाविद्यालयामध्ये असलेल्या बहुविध विषयाची निवड यामध्ये पीकशास्त्र, संस्कृत, पाली, इलेक्ट्रॉनिक्स तसेच JEE NEET, CET या विशेष तयारी वर्गाचा आम्हाला फायदा झाला महाविद्यालय मध्ये असलेल्या विशेष कला दालन, योग वर्गाची आम्हाला मदत झाल्याचे नमूद केलेमहाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आमदार श्री. सतीश चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवि पाटील, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य प्रा. अरूण काटे, कला व वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर हिवरे व व्होकेशनल विभागाचे उपप्राचार्य प्रा. विजय नलावडे तसेच देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुभाष लहाने यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०४ मे २०२६

# १२ वी नंतर काय करावे ? - विद्यार्थ्यांसाठी सविस्तर मार्गदर्शन

१२ वी पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. याच वेळी घेतलेले निर्णय पुढील करिअर, आर्थिक स्थैर्य आणि जीवनशैली ठरवतात. अनेक विद्यार्थ्यांना “आता पुढे काय?” हा प्रश्न सतावतो. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास हा टप्पा संधींचा दरवाजा ठरू शकतो.१. सर्वप्रथम स्वतःला ओळखा*करिअर निवडण्यापूर्वी स्वतःचा अभ्यास करणे आवश्यक आहे:आपली आवड (Interest)कौशल्ये (Skills)क्षमता (Strengths)व्यक्तिमत्व (Personality)उदाहरण: जर तुम्हाला गणित, लॉजिक आवडत असेल तर इंजिनिअरिंग किंवा डेटा सायन्स योग्य पर्याय ठरू शकतो.* २. शाखेनुसार उपलब्ध करिअर पर्याय** विज्ञान शाखा (Science Stream)*(A) PCM (Physics, Chemistry, Maths):इंजिनिअरिंग (B.E./B.Tech)आर्किटेक्चर (B.Arch)B.Sc (Physics, Chemistry, Maths)NDA (National Defence Academy)(B) PCB (Physics, Chemistry, Biology):MBBS / BDS / BAMS / BHMSB.Sc Nursing / PharmacyBiotechnology / Microbiology* वाणिज्य शाखा (Commerce Stream)*B.Com (Bachelor of Commerce)CA (Chartered Accountant)CS (Company Secretary)BBA / MBA (Management)Banking / Finance क्षेत्र* कला शाखा (Arts Stream)*BA (History, Political Science, Sociology)Journalism & Mass CommunicationLaw (LLB)Designing / Fine ArtsUPSC/MPSC तयारी* ३. स्किल-आधारित कोर्सेस (Skill-Based Courses)*जर तुम्हाला लवकर नोकरी हवी असेल तर:ITI / पॉलीटेकनिक तसेच...वंदेमातरम आयटीआय कॉलेज मधून खालील डिप्लोमा / कोर्स पूर्ण करू शकतो• शासकीय विविध विभागात सिव्हिल इंजिनिअरिंग असिस्टंट अर्थात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पोस्टवर जॉब करण्यासाठी तसेच शासकीय गुत्तेदारीचे लायसन काढून स्वतःचा बिजनेस सुरु करण्यासाठी Architecture Draughtsman Civil Engineering Diploma म्हणजेच वास्तूशास्त्र आरेखक हि 2 वर्षे कालावधीची पदविका किंवा 1 वर्षे कालावधीचा Construction Supervisor अर्थात बांधकाम पर्यवेक्षक कोर्स पूर्ण करून नशिब आजमावून पाहू शकता• 2 वर्षे कालावधीचा ELECTRICIAN DIPLOMA पूर्ण करून महावितरण किंवा इतर विभागात जॉब करण्यासाठी तसेच कॉंट्रॅक्टरशिपचे लायसन काढून स्वतःचा बिजनेस करु शकता• D.Ed ला इक्वल असलेला हस्तकला व कार्यानुभव शिक्षक अर्थात C. T. C कोर्स करून आपल्या जवळच्या जिल्हा परिषद शाळेत 18,000 रु पेयमेन्ट वर पार्टटाईम जॉब करू शकता, आणि उर्वरित रिकाम्या वेळेत हस्तकलेतून विविध वस्तू तयार करून स्वतःचा बिजनेस करू शकता Digital MarketingGraphic DesigningAnimation & VFXHotel Management* ४. स्पर्धा परीक्षा (Competitive Exams)*JEE (Engineering)NEET (Medical)UPSC / MPSC (Civil Services)Banking Exams (IBPS, SBI)* तुम्ही “ड्रॉपर” असाल (जसे तुम्ही सध्या JEE साठी तयारी करत आहात), तर योग्य रणनीती, वेळ व्यवस्थापन आणि नियमित अभ्यास खूप महत्त्वाचा आहे*५. योग्य निर्णय घेण्यासाठी टिप्सइतरांच्या दबावाखाली निर्णय घेऊ नकाआपल्या आवडीला प्राधान्य द्याकरिअर काउन्सेलिंग घ्याइंटरनेट आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन वापरादीर्घकालीन संधी (Future Scope) तपासा६. टाळावयाच्या सामान्य चुकाफक्त मित्र किंवा समाज काय म्हणतो यावर निर्णय घेऊ नयेकरिअरची पूर्ण माहिती न घेता कोर्स निवडू नयेतफक्त “पैसा” किंवा “ट्रेंड” पाहून निर्णय घेणे टाळावे* निष्कर्ष*१२वी नंतरचा निर्णय हा आयुष्याचा पाया असतो. योग्य माहिती, स्वतःची ओळख आणि स्पष्ट ध्येय असल्यास यश निश्चित मिळते. कोणताही मार्ग निवडा — मेहनत, सातत्य आणि योग्य दिशा असेल तर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.



**भगवंत पाळवदे,**
**अंबाजोगाई**
9975704391
/ 8007 33 34 35

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002